PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 1

# जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी आधिका–याची भुमिका व जबाबदा–या

**प्रा. धप्पाधुळे रामेश्वर शंकरराव**
असिस्टंट प्रोफेसर, लोकप्रशासन विभाग,
शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय, लोहारा
जिल्हा – उस्मानाबाद **महाराष्ट्र भारत**

**गोषवारा (Abstract):-**

जिल्हा पातळीवर पंचायत व्यवस्थेचे उच्च अग्रटोक म्हणजे जिल्हा परिषद होय. यामध्ये पंचायत समितीचे सभापती, संबंधीत क्षेत्रांचे आमदार, खासदार, महिला प्रतिनिधी, अनुसूचित जाती व जमातींचे व मागासवर्गीयांचे प्रतिनिधी यांचा समावेश असतो. सहकारी मध्यवर्ती बॅका किंवा बाजार समितीसारखा सहकारी संस्थांचे प्रतिनिधी यांचे जिल्हा परिषदेवर नामांकन केले जाते. सभापती व उपसभापती यांची निवड पंचयायत समितीच्या सभापतींकडून केली जाते.

दिनांक.०१.११.१९५९ पासून जिल्हा परिषदांच्या कर्मचा–यांच्या कामास सरुवात झाली. जिल्हा परिषद ॲक्ट कलम S.१९२ मध्ये जिल्हा परिषदेचे अधिकार आणि कार्य यांचा निर्देश केलेला आहे. जिल्हा परिषदा आणि त्यांच्या स्थायी समित्या ज्या त्या विषयांच्या अनुसंघाने जी काही माहिती आहे ती स्वीकारतील, त्यांचे परीक्षण करतील आणि त्यांच्या मंजूरीचा मार्ग मोकळा करतील.११ व्या शेडयुल मध्ये एकूण२९ विषय दिलेले आहेत या परीक्षणाच्या कामाशिवाय आणि ॲक्टच्या शेडयुल १ नुसार निर्देशित केलेल्या प्लान व नॉन –प्लान योजनांची पाहणी करणे इत्यादी कामे जिल्हा परिषदा करतील प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून जिल्हा परिषदा आणि संबंधीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भुमिका व जवाबदा–यांचा उहापोह करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**मुख्य संज्ञा**: महाराष्ट्, जिल्हा परिषद, पंचायत समिती, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रशासन, वैधानिक कर्तव्ये इत्यादी

**मुख्य कार्यकारी अधिका–यांची कार्ये :–**

G.o.Ms. No.४८८,PR&RD दिनांक ०३.१२.१९९६ नुसार मुख्य कार्यकारी अधिका–यांची कार्य पुर्नरचित केली गेली आहेत. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिका–याच्या कामाचे स्वरुप खालील मुद्यांच्या आधारे स्पष्ट होते.

१. मुख्य कार्यकारी अधिका–याची नेमणुक शासनातर्फे होत असून त्यांची शासनाच्या मर्जीप्रमाणे बदली होउ शकते. त्याला लागू असलेल्या सेवा शर्ती संबंधीत नियमाप्रमाणे लागू असतील.

२. पुर्वीच्या जिल्हा मंडळातर्गत अध्यक्ष हे कार्यकारी अधिकारी होते. जिल्हा परिषदांची निमिर्ती झाल्यानंतर जिल्हा परिषदांचा आवाका व कामाचे स्वरुप वाढून जिल्हाधिका—यांच्या कामाचा एवढा व्याप वाढला आणि त्यामुळे शासनाला एका वरीष्ठ कार्यकारी अधिकारी नेमण्याची गरज वाटू लागली.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका—यांच्या कार्याचे दोन गटात विभागणी करता येईल १. वैधानिक स्वरुपाची कार्य आणि २. प्रशासकीय स्वरुपाची कार्य

**मुख्य कार्यकारी अधिका—यांची वैधानिक स्वरुपाची कार्य :—**

सीईओ म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा मुख्य कार्यपालन अधिकारी हे जिल्हा परिषदेचे प्रमुख अधिकार स्त्रोत आहे. जिल्हा परिषद कायद्यातील तरतुदी नुसार जिल्हा परिषदेचे सर्व अधिकार एकवटलेले दिसतात. त्यांचे वैधानिक स्वरुपाची कार्ये खालील प्रमाणे आहेत.

१. जिल्हा परिषद कायद्यामध्ये अंतर्भूत असलेल्या किंवा वेळोवेळी निर्देशीत केलेल्या अधिकारांचे निर्वहन करणे मुख्यकार्यकारी अधिका—यास बंधनकारक आहे.
२. शासनाने घालवुन दिलेलया नियमानुसार जिल्हा परिषदेतील इतर अधिकारी व कर्मचा—यांची कर्तव्ये निश्चित करुन त्यांच्या कामावर नियंत्रण ठेवणे.
३. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका—यास जिल्हा परिषदेच्या सर्व बैठका किंवा स्थायी समितीच्या बैठका आयोजित करण्याचे हक्क आहेत. ते मंडळ परिषदेच्या बैठका घेउन त्यातील वेगवेगळया विषयांवर चर्चा घडवून आणू शकतात. परंतू त्यांना कोणत्याही ठरावावर मतदान करण्याचा अधिकार मात्र नाहीत.
४. जिल्हा परिषदे अंतर्गत येणा—या कोणत्याही कार्यालयातर्फे, कोणतीही माहिती मागविणे, किंवा माहितीपत्राके मागविणे, किंवा मंडल परिषद किंवा संस्था, किंवा कोणत्याही खात्याचा अंकेक्षण अहवाल मागविणे किंवा अंकेक्षण अहवाला संबंधी कार्यकारी प्रशश्सनाच्या संदर्भात कोणत्याही माहिती मागवून ती तपासून अहवाल अद्यावत ठेवण्याच्या सूचना करणे.
५. जिल्हा परिषदेच्या आणि स्थायी समितीच्या सर्व प्रकारच्या कामकाजंशी संबंधीत कागदपत्रे किंवा दस्तऐवज यांचे परिरक्षण करण्याची जबाबदारी सांभाळणे
६. जिल्हा परिषदा आणि संबंधीत स्थायी समितींच्या ठरावांची योग्य ती कार्यवाही करण्याची किंवा योग्य अमंलबजावणी करण्यासाठी जबाबदार असणे.
७. जिल्हा परिषदेच्या सर्व उपक्रमांचे कार्यवहन नीट होते. किंवा नाही यांची वेळोवेळी तपासणी करणे.
८. जिल्हा परिषदांच्या सर्व कामे आणि विकासयोजना गतिमान करण्याची योग्य ते उपाय योजने.
९. जिल्हा परिषदेच्या व्यवस्थापनाच्या अंतर्गत येणा—या सर्व कामांचे, योजनांचे किंवा संस्थांचे केंव्हाही तपासणी करण्याचे अधिकार असणे.
१०. जिल्हा परिषदेच्या मंडळ परिषद किंवा स्थायी समितीच्या व्यवस्थापनाच्या सरळ अंतर्गत येणा—या सर्व कामांचे, योजनांचे किंवा संस्थांचे केंव्हाही तपासणी करण्याचे अधिकार असणे.
११. वेळोवेळी होणा—या करारांमध्ये त्यांना साक्षांकित करुन त्यांवर कार्यवाहीस तत्पर करण्याचे जिल्हा परिषदेचा सक्षम अधिकारी म्हणून काम पाहणे.
१२. जिल्हा परिषदेने जारी केलेल्या निर्देशांची अमंलबजावणी करणे.

१३. कायद्यानुसार प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन सरकारने पारित केलेल्या आदेशांची कार्यान्वित करुन त्यानुसार शासनाला पालन अहवाल सादर करणे आणि त्यांची नक्कल अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना देणे.

G.o.Ms. No.४८८,PR&RD, दिनांक ०३.१२.९६ अंतर्गत जारी केलेले नियम

**प्रशासकीय कर्तव्ये :–**

१. जिल्हा परिषदेअंतर्गत येणा–या किंवा मंडळ परिषद, शिक्षणाधिकारी, मुख्य कार्यकारी वित अधिकारी आणि कार्यकारी अभियंता इत्यादी कोणत्याही अधिका–यांकडून किंवा सेवक धारण कार्यालयातून कोणतीही माहिती, परतावा, खाते विधान किंवा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी मागवू शकतात.
२. जिल्हा परिषद सदस्यांच्या किंवा स्थायी समितीच्या कार्यालयातील रिक्त पदांबाबत ती पदे प्रासंगिक आहेत किंवा कार्यालयात वेळेनुसार भरावयाची आहेत हे पाहून ते भरावयाची कार्यवाही करणे.
३. जिल्हा परिषदेच्या सर्व उपक्रमांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे.
४. जिल्हा परिषदेंतर्गत काम करणा–या सर्व अधिका–यांवर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे.
५. कर्मचा–यांचे पगारवाढ (Increments) मंजूर करणे आणि विशेष अपंगत्व रजा वगळून मंडळ विकास अधिका–यांच्या बाकी सर्व प्रकारच्या रजा मंजूर करणे.

**वित्तीय अधिकार :–**

१. वित्तीय सर्वांचे वेतन भत्ते मुजूर करणे आणि खालील कर्मचा–यांना प्रवास भत्ता व कर्ज देण्याची व्यवस्था करणे :

(अ) १. अधिक्षक, वरिष्ठ सहायक, जिल्हा परिषदेची लेखापाल
२. सर्व नियमित दवाखान्यांचे आणि सीडीएम स्टोअर्सचे वैद्यकीय अधिकारी.
३. जिल्हा परिषदांच्या माध्यमिक शाळांचे शिक्षक व मुख्याध्यापक

(ब). औषधांचा पुरवठा व इतर आवश्यक गोष्टी बजट तरतुदीनुसार आणि बिलावरील किंमती नुसार मुल्य मंजूर करणे.

**निष्कर्ष :–**

१. जिल्हा पातळीवर पंचयात व्यवस्थेचे उच्च अग्रटोक म्हणजे जिल्हा परिषद होय. यामध्ये पंचायत समितीचे सभापती, संबंधीत क्षेत्रांचे आमदार, खासदार, महिला प्रतिनिधी, अनुसूचित जाती व जमातींचे व मागासवर्गीयांचे प्रतनिधी यांचा समावेश असतो.
२. जिल्हा ॲक्ट कलम S.१९२ मध्ये जिल्हा परिषदेचे अधिकार आणि कार्य यांचा निर्देश केलेला आहे.
३. G.o.Ms. No.४८८,PR&RD,दिनांक ०३.१२.९६ नुसार मुख्य कार्यकारी अधिका–यांची कार्य पुर्नरचित केली गेली आहेत. त्यानुसाार त्याचे कार्य शासनाधिन राहून करावे लागते.
४. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका–यांच्या कार्याचे दोन गटात विभागणी करता येईल.१. वैधानिक स्वरुपाची कार्य आणि २. प्रशासकीय स्वरुपाची कार्ये

५. सीईओ म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा मुख्य कार्यपालन अधिकारी हे जिल्हा परिषदेचे प्रमुख अधिकार स्त्रोत आहे. जिल्हा परिषद कायद्यातील तरतुदी नुसार जिल्हा परिषदेचे सर्व अधिकार एकवटलेले दिसतात.

६. G.o.Ms. No.४८८,PR&RD, , दिनांक ०३.१२.९६ अंतर्गत जारी केलेले नियमानुसार मुख्य कार्यकारी अधिका—यांची पाच प्रशासकीय कर्तव्ये नमुद केलेली आहेत.

७. वित्तीय: सर्वांचे वेतन भत्ते मंजुर करणे आणि कर्मचा—यांना प्रवास व कर्ज देण्याची व्यवस्था करणे ही मुख्यकार्यकारी अधिका—यांची वित्तीय क्षेत्रातील कर्तव्ये आहेत.

## संदर्भसुची :—

१. सुवर्ण गुदगे: लोकप्रशासन,प्रशांत पब्लिकेशन पुणे.

२. डॉ.बी.बी. पाटील: लोकप्रशासन, फडके प्रकाशन पुणे

३. Public Administration: Traditions of Inquiry and Philosophies of knowledge by Norma M. Reiccucci Georgetown University press, २०१०

४. The Collaborative Public Manager By Rosemary O'Leary; Lisa Blomgren Bingham Georgetown University press,२००८